शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर
( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )
विद्यानगर, राजाराम कॉलेज जवळ, कोल्हापूर , पिन कोड- ४१६००४
फोननंबर-(०२३१)–२५२१०३८ वेबसाइट- www.gpkolhapur.org.in


जा.क्र. शातंनिको/परीक्षा विभाग /२०२२/८२ दि. २२ मार्च २०२२

# विद्यार्थ्यांना सूचना

विषय:- नियमीत विद्यार्थ्यांसाठी विषय नोंदणी व परीक्षा अर्ज भरणेबाबत (R, R+RR)

सर्व नियमित विद्यार्थ्यांना कळविणेत येते की, सम सत्र 2021-22 च्या विषयांची नोदंणी व परीक्षा अर्ज खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे भरावयाचा आहे.

| DATE | Programme(Both shifts) |
|---|---|
| 28/03/2022 to 6/4/2022 | All Programme |

नियमीत (R) परीक्षा विद्यार्थ्यांसाठी ६०० रूपये (सत्र परिक्षा -५०० चाचणी परिक्षा १०० )

नियमीत (R+3RR) विद्यार्थ्यांसाठी ९०० रूपये ( सत्र परिक्षा ८०० चाचणी परिक्षा १००)

नियमीत (R + more than 3RR) विद्यार्थ्यांसाठी ११०० रूपये (सत्र परिक्षा -१००० चाचणी परिक्षा १००)

१) विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासाठी प्रथमता विद्यार्थ्यांनी संस्थेच्या सांकेतीक स्थळावर (www.gpkolhapur.org.in) त्यांचे माहिती पत्रक (E-Registration) बिनचुक भरणे आवश्यक आहे. माहितीपत्रकामध्ये फोटो, ई-मेल ॲड्रेस, मोबाईल नंबर ची माहिती काळजीपूर्वक वाचून गरज असल्यास दुरुस्त करून घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचाच मोबाईल नंबर व ई-मेल आयडी भरावा जेणेकरुन संगणक प्रणालीचा वापर विद्यार्थी वैयक्तीकपणे करू शकतील. विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधित व इतर कार्यालयीन कामकाजाकरीता माहिती पत्रकामध्ये नोंदणी केलेल्या या मोबाईल नंबर व ई-मेल आयडी व्दारे सुचना देणेत येतील.

२) आपला पासवर्ड विद्यार्थ्यांनी गोपनिय ठेवावा तसेच तो विसरणार नाही याची दक्षता घ्यावी. पासवर्ड विसरलेस रु.५०/- इतके शुल्क भरून पासवर्ड घेता येईल.

३) <u>सर्व विद्यार्थ्यांनी सम सत्र २०२१-२२ विषय नोंदणी पुनः नोंदणी संबंधी आपल्या विभागातील नोंदणी अधिकारी / वर्गशिक्षक यांच्याशी संपर्क साधून योग्य ते मार्गदर्शन</u>

घ्यावे व नंतर ऑनलाईन अर्ज भरावा. Detain झालेल्या विषयांची नोंदणी पुन्हा R म्हणून करुन विद्यार्थ्यांने त्याचे सत्र कर्म पूर्ण करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

(४) एकदा विषय नोंदणी/ परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांने ऑनलाईन Save केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत विषय नोंदणी अधिकारी / वर्ग-शिक्षक यांचे कडुन बदल करून घ्यावा व तदनुसार केलेल्या बदलाची खात्री करून सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

५) विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्तीने भरलेनंतर विषयनोंदणी /परीक्षा अर्जाची छापील प्रत घेऊन शैक्षणिक व इतर फी ऑनलाईन पद्धतीने आकारणेसाठी विद्यार्थी विभागाशी आवश्यकता असल्यास संपर्क साधावा. विद्यार्थी विभागाने आकारलेले शैक्षणिक शुल्क, इतर फी व परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने एकत्रीत भरावी. फी पावतीची छापील प्रत घ्यावी. या पावतीची दुय्यम प्रत व विषयनोंदणी अर्ज विभागातील विषय नोंदणी अधिकारी यांच्याकडे कायम करणेसाठी (confirm ) जमा करावे. विषय नोंदणी अधिकारी दि.२८/३/२०२२ ते ८/४/२०२२ या कालावधीत अर्ज कायम (confirm) करतील.

६ ) ज्या विद्यार्थ्यांनी मागील सत्राच्या सुरवातीस वार्षिक फी (Tuitions fees) भरलेली असेल त्यांनी पुन्हा सदर फी भरणेची गरज नाही. त्यांनी या सत्राची केवळ परिक्षा व चाचणी शुल्क ( व लागु असल्यास टूल की इ.) भरणेचे आहे.

विषय नोंदणी अधिकार्यांनी अर्ज कायम केल्याशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

- अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण आल्यास परीक्षा विभागामध्ये संपर्क साधावा.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन ,कोल्हापूर

प्रत:-

१. सर्व नोटीस बोर्डवर जाहीर..

२. रोखपाल व विद्यार्थी विभाग यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

३. सर्व विभागाना जाहीर करणेसाठी

४. संस्थेच्या वेबसाईटवर